**सहकारी सूतगिरणी प्रकल्पांचे फेरमूल्यांकन करण्यासाठी गठीत मंत्रिमंडळ उपसमितीची रचना सुधारित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः प्रकल्प -१२१५/प्र.क्र.४१/टेक्स-१ (अ)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२.
तारीख : ०३ ऑगस्ट, २०१९

वाचा :-

१. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्र.सूतगि- १२००/ प्र.क्र.१५३/टेक्स-१, दि.१३.०६.२०००
२. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्र.सूतगि - ११०८/ प्र.क्र.९१/टेक्स-१ (अ), दि.३०.०६.२०११.
३. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्र.सूतगि - ११०८/ प्र.क्र.९१/टेक्स-१ (अ), दि.३०.०७.२०१४.
४. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, समक्रमांकीत शासन निर्णय, दि.१६.०३.२०१७.
५. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय,क्र.सूतगि- ३३१८/प्र.क्र.६७/टेक्स-१(ब), दि.२१.०१.२०१९.

**प्रस्तावना :-**

वाचा क्र.४ येथील शासन निर्णयान्वये, सहकारी सूतगिरणी प्रकल्पांचे फेरमूल्यांकन करण्यासाठी वस्त्रोद्योग विभागाची मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली आहे. सदर उपसमिती ही संबंधित मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांच्या नावाने व त्यांच्या अधिपत्याखालील विभागांच्या / खात्यांच्या नावाने गठित करण्यात आली होती. मात्र, मा. मंत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा सदस्य यांच्या अधिपत्याखालील विभागांमध्ये / खात्यांमध्ये बदल झाल्याने संदिग्धता निर्माण होऊ नये म्हणून सदर समिती केवळ मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांच्या पदनामाने सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

सहकारी सूतगिरणी प्रकल्पांचे फेरमूल्यांकन करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या वस्त्रोद्योग विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीची रचना खालीलप्रमाणे असेल.

| | | |
|---|---|---|
| १. मा. मंत्री (वस्त्रोद्योग) | : | अध्यक्ष |
| २. मा. मंत्री (पर्यटन) | : | सदस्य |
| ३. मा. मंत्री (कौशल्य विकास व माजी सैनिकांचे कल्याण) | : | सदस्य |

४. मा. राज्यमंत्री (वित्त व नियोजन) : सदस्य

५. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव (वित्त) : सदस्य

६. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव (वस्त्रोद्योग) : सदस्य सचिव

२. सदर उपसमितीची कार्यकक्षा दि.१६.०३.२०१७ व दि.२१.०१.२०१९ रोजीच्या नमूद शासन निर्णयानुसार असेल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०३१२३१५२४००२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vishal Vishvas Madane

Digitally signed by Vishal Vishvas Madane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-op Marketing and Textile, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bb0ed28a897fc87f69fe8807b3d9428966ce3233ed b83a20c38834c19f2e3793, cn=Vishal Vishvas Madane
Date: 2019.08.03 12:41:08 +05'30'

**( विशाल मदने )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई - ३२.
२. मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२.
३. मा. मंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२.
४. मा. मंत्री (कौशल्य विकास व माजी सैनिकांचे कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२.
५. मा. राज्यमंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२.
६. मा. राज्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२.
७. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२.
८. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई - ३२.
९. सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई - ३२.
१०. आयुक्त, वस्त्रोद्योग, वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
११. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्या., वकील हाऊस, मुंबई.
१२. निवडनस्ती (कार्यासन टेक्स १-अ / टेक्स १-ब).